आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१ जानेवारी २०२५ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- जगभरात नव्या वर्षाचं उत्साहात स्वागत, राष्ट्रपती, प्रधानमंत्र्यांकडून देशवासियांना नववर्षाच्या शुभेच्छा

- महाराष्ट्रात महानगरपालिका निवडणुकीसाठी छाननीनंतर ३३ हजार ६०६ उमेदवारी अर्ज वैध ठरल्याची निवडणूक आयोगाची माहिती

- ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला साताऱ्यात सुरूवात

**आणि**

- न्यूयॉर्कच्या महापौरपदी डेमॉक्रॅटिक पक्षाचे नेते जोहरान ममदानी यांनी घेतली शपथ

**<><><><><>**

नववर्षाचं स्वागत जगभरात काल आनंदात आणि उत्साहात झालं. राजधानी दिल्लीसह देशाच्या इतर भागातही नववर्षाचं स्वागत करण्यासाठी नागरिक एकत्र आले होते.

मुंबईत गेटवे ऑफ इंडिया, मरीन ड्राइव्ह, गिरगाव, दादर, जुहू चौपाटी, आणि इतर सार्वजनिक ठिकाणी नागरिकांनी एकत्र येऊन मोठ्या जल्लोषात नववर्षाचं स्वागत केलं. नव्या वर्षाच्या पहाटे आज मुंबईत पावसानं हजेरी लावली. त्यामुळे वातावरणात गारवा पसरला.

गोवा, मध्य प्रदेश, तेलंगणामध्ये स्थानिक नागरिकांनी आणि पर्यटकांनी फटाक्यांची आतषबाजी केली. अमृतसरमध्ये श्री हरमंदीर साहिबमध्ये नव्या वर्षाचं स्वागत प्रार्थनेनं झालं.

काश्मीर खोऱ्यात काल नववर्षाचं स्वागत मोठ्या उत्साहात झालं. गुलमर्ग, पहलगाम, सोनमर्ग आणि इतर पर्यटन स्थळांवर तसंच श्रीनगरमध्ये लाल चौक इथल्या ऐतिहासिक क्लॉक टॉवरजवळही नागरिकांनी एकत्र येऊन नववर्षाचं स्वागत मोठ्या जल्लोषात केलं. यावेळी शहरात, प्रमुख रस्त्यांवर आणि पर्यटन स्थळांवर बहू-स्तरीय सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली होती.

ऑस्ट्रेलियामध्ये सिडनी इथं आतषबाजीने नववर्षाचं स्वागत झालं. जपानमध्ये प्रार्थनागुहांमध्ये घंटा नादानं नव्या वर्षाचं स्वागत झालं. पॅरिस, न्यूयॉर्क आणि जगभरातल्या इतर शहरांमध्येही नवीन वर्षाचं स्वागत करण्यासाठी नागरिक मोठ्या संख्येनं एकत्र आले होते.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी नागरिकांना नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

महाराष्ट्रातल्या महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्जांची काल छाननी झाली. त्यानंतर राज्य निवडणूक आयोगानं सर्व महानगरपालिकांमध्ये दाखल झालेल्या एकंदर उमेदवारी अर्जांबाबत माहिती दिली. याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून आता ऐकूया…

**- - व्हीसी - -**

*(राज्यातल्या २९ महानगरपालिकांच्या एकूण ८९३ प्रभागांसाठी दोन हजार ८६९ जागांसाठी ३३ हजार ६०६ उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले आहेत. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी २ हजार ५१६ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. राज्य निवडणूक आयोगाने केलेल्या छाननीत त्यातले १६७ अर्ज अवैध ठरले. नवी मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी एकूण ९४६ अर्ज दाखल झाले. या अर्जांच्या छाननीनंतर ११७ अर्ज अवैध ठरले तर ८३९ अर्ज वैध ठरले. सोलापूर महापालिका निवडणुकीसाठी एकूण १ हजार ४६० अर्ज दाखल झाले होते. छाननीत या अर्जांपैकी २३० अर्ज अवैध ठरले असून १ हजार २३० अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. लातूर महापालिकेसाठी एकूण ७५८ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. छाननीनंतर त्यापैकी ६९६ अर्ज वैध ठरले असून, ६३ अर्ज बाद करण्यात आले. जालना महानगरपालिकेसाठी एकूण एक हजार २६० उमेदवारी अर्ज दाखल झाले होते, छाननीनंतर एक हजार २३४ अर्ज वैध ठरले आहेत.*

*दरम्यान, पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी युती करण्यासाठी शिवसेनेशी चर्चा सुरू असल्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितलं. ते आज पुणे इथे वार्ताहरांशी बोलत होते. पुणे महानगरपालिका निवडणुकीसाठी पक्षातल्या*

*प्रतिस्पर्धी उमेदवाराचा अर्ज फाडून गिळल्याच्या आरोपावरून शिवसेनेच्या उमेदवाराविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उद्धव कांबळे असं या उमेदवाराचं नाव आहे. ठाणे महापालिका निवडणुकीसाठी काही उमेदवारी अर्ज अवैध ठरवल्यामुळे निवडणूक अधिकाऱ्यांनी पक्षपात केल्याचा आरोप विरोधी पक्षांनी केला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे राजन विचारे, मनसेचे अविनाश जाधव आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जितेंद्र आव्हाड यांनी काल पत्रकार परिषद घेत हा आरोप केला.*

*येत्या १५ जानेवारी रोजी होणाऱ्या महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत उद्या असून सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत अर्ज मागे घेता येतील. तीन जानेवारीला निवडणूक चिन्हाचं वाटप झाल्यानतर अंतिम उमेदवार यादी जाहीर होणार आहे.)*

**<><><><><>**

डीआरडीओ अर्थात संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेच्या स्थापना दिनानिमित्त संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी सर्व वैज्ञानिक, कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांना शुभेच्छा दिल्या आहेत. डीआरडीओची वचनबद्धता, वैज्ञानिक प्रतिभा आणि देशाप्रति असलेल्या कर्तव्याची जाणीव देशाची संरक्षण सिद्धता आणि या क्षेत्रातल्या आत्मनिर्भरतेसाठी अतिशय महत्त्वाची आहे, असं त्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

९९ वं अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन आजपासून साताऱ्यात सुरू होत आहे. आज सकाळी ध्वजारोहण ग्रंथप्रदर्शनाचं उद्घाटन, प्रकाशन कट्टा, कवी कट्टा, गझल कट्टा या कार्यक्रमांनी समारंभाची सुरुवात झाली. यावेळी ग्रंथ दिंडी काढण्यात आली. दोन जानेवारी रोजी साहित्य संमेलनाचं औपचारिक उद्घाटन होणार आहे. ज्येष्ठ लेखिका आणि विचारवंत डॉ. मृदुला गर्ग यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, मराठी भाषा मंत्री उदय सामंत, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. तारा भवाळकर, संमेलनाचे नियोजित अध्यक्ष ज्येष्ठ लेखक विश्वास पाटील समारंभाला उपस्थित राहतील.

**<><><><><>**

पुणे जिल्ह्यात 'भीमा कोरेगाव' इथं आज शौर्यदिन साजरा होत आहे. या ठिकाणी असलेल्या विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी लाखो नागरिकांनी मोठी गर्दी केली आहे.

ऐतिहासिक विजयस्तंभावर केलेली फुलांची आकर्षक सजावट सर्वांचं लक्ष वेधून घेत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भीमा कोरेगावच्या शौर्यस्तंभाला अभिवादन केलं.

विजय दिनाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षिततेसाठी ५ हजार पोलीस तैनात करण्यात आले आहेत. तसंच ५० पोलीस टॉवर, १० ड्रोनच्या साहाय्यानं याठिकाणी लक्ष ठेवलं जाईल. विजय स्तंभाला भेट देणाऱ्या नागरिकांसाठी जिल्हा प्रशासनानं सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. 'बार्टी' नं ३१० बुक स्टॉल उभारले आहेत. पुणे परिवहन मंडळानं मोफत बस सुविधा उपलब्ध केली आहे.

**<><><><><>**

सरलेलं २०२५ हे वर्षं भारतीय क्रीडा क्षेत्रासाठी महत्त्वाचं ठरलं. या वर्षात आंतरराष्ट्रीय स्तरावर पदकांची कमाई तर झालीच पण खेळांमध्ये विक्रमी सरकारी गुंतवणूक, महत्वाच्या धोरणात्मक सुधारणा आणि विस्तारित पायाभूत सुविधांनी भारतीय क्रीडा विश्वात नव्या युगाचा पाया रचला. अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

**---------------व्हीसी-----------------**

*(केंद्र सरकारने २०२५-२६ या आर्थिक वर्षात युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयासाठी ३ हजार ७९४ कोटी रुपयांची विक्रमी तरतूद केली. जुलै महिन्यात केंद्रीय मंत्रिमंडळाने राष्ट्रीय क्रीडा धोरण २०२५ला मंजुरी दिली. या नवीन धोरणात भारताला जागतिक क्रीडा महासत्ता बनवण्यासाठी दीर्घकालीन योजना तसंच २०३६मध्ये भारतात ऑलिम्पिक भरवण्यासाठीच्या धोरणांचा समावेश आहे. ऑगस्ट महिन्यात राष्ट्रीय क्रीडा प्रशासन कायदा २०२५ लागू करण्यात आला. त्यामुळे या सुधारणांना आणखी गती मिळाली. क्रीडा संस्थांना आंतरराष्ट्रीय मानकांनुसार लागू असलेल्या आचारसंहितेचं पालन करणं, महिला, अल्पवयीन खेळाडू तसंच दिव्यांग खेळाडूंच्या वैयक्तिक संरक्षणासाठीचं सुरक्षित क्रीडा धोरण स्वीकारणं या कायद्यामुळे बंधनकारक झालं. नोव्हेंबर महिन्यात भारताने २०३०मध्ये होणाऱ्या राष्ट्रकुल स्पर्धांचं यजमान पद मिळवलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारतीय खेळाडूंना सातत्याने वैयक्तिक पाठिंबा दर्शवला. भारताचं नाव उंचावणाऱ्या खेळाडूंशी अनौपचारिक संवाद साधणं तसंच या खेळाडूंची शिस्त, लवचिकता आणि तंदुरुस्तीसाठीचं प्राधान्य याला इतर तरुणांनी महत्त्व देण्याचं आवाहनही ते सातत्याने करतात. याच भावनेने*

*प्रधानमंत्र्यांनी यंदा आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषक विजेत्या संघाची तसंच अंध महिला टी-२० विश्वचषक संघांची भेट घेतली आणि त्यांचं कौतुक केलं.)*

**<><><><><>**

जोहरान ममदानी यांनी अमेरिकेत न्यूयॉर्क शहराच्या महापौरपदाचा पदभार काल रात्री एका  समारंभात स्वीकारला. ही आपल्यासाठी सन्मानाची बाब असल्याची भावना ममदानी यांनी महापौरपदाची शपथ घेतल्यानंतर व्यक्त केली. न्यूयॉर्कच्या ॲटर्नी जनरल लिटिया जेम्स यांनी त्यांना शपथ दिली.

**<><><><><>**

बिहारमध्ये बेगुसराय जिल्ह्यात पोलिसांच्या विशेष कृती दलाबरोबर काल झालेल्या चकमकीत एक नक्षली ठार झाला. 'दयानंद मालाकर, उर्फ छोटू'  अशी त्याचं  नाव असून, त्याच्यावर  ५० हजार रुपयांचं बक्षीस होतं. १४ पेक्षा जास्त गुन्हेगारी प्रकरणांमध्ये, तसंच उत्तर बिहारमध्ये अनेक नक्षली कारवायांमध्ये त्याचा सहभाग असल्याचा आरोप आहे.  या कारवाईत ५.५६ एमएम इन्सास रायफल, एक देशी बनावटीचं पिस्टल, २५ जिवंत काडतुसं आणि १५ वापरलेली काडतुसं जप्त करण्यात आल्याचं पोलिसांनी सांगितलं.

**<><><><><>**

DRI, अर्थात महसूल गुप्तचर संचालनालयानं काल मुंबई छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर केलेल्या कारवाईत ३ कोटी ८९ लाख रुपये किमतीच्या सोन्याची तस्करी उघडकीला आणली. यावेळी  DRI च्या पथकानं बहरीन इथून आलेल्या एका प्रवाशाकडून मेणाच्या स्वरूपात सोन्याची भुकटी भरलेल्या १२ कॅप्सूल जप्त केल्या. या प्रकरणी पुढला तपास सुरु असल्याचं DRI  च्या सूत्रांनी सांगितलं.

**//<><><><><>//**